**आर.सी. सी. ३१०/२०२३**
**सरकार वि. बशीर शेख**
**साक्षीदार क्र. ०२, नि. क्र.२२**

साक्षीदाराचे नाव- भाउसाहेब कमळाकर तायडे
वय. २७ वर्ष, उपजिवीका.- शेती
रा.गणेशपुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

**<u>सरतपास शपथेवर सरकारी पक्षातर्फे श्री.पी.आर.कुर्लेकर यांच्या मार्फत सुरु.</u>**

**१.** दिनांक १६.०६.२०२३ रोजी पोलिसांनी मला गट क्र. ३७ मध्ये पंचनाम्यासाठी बोलाविले होते. त्यावेळेस मी, पोलिस नामे पाटील, हानिफ शहा, सलीम शहा हजर होते. घटनास्थळ मला पोलिसांनी दाखविले होते. घटनास्थळी बशीर शेख व ईब्राहीम शहा मध्ये हानामारी झाली होती. पोलिसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केली. पोलिसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळावरुन काठी जप्त केली. काठी दाखविल्यास मी ओळखु शकतो. आता मला आर्टिकल अ वरील ती काठी दाखविण्यात आली ती तीच असुन ती मी ओळखली. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला तो तोच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी २३ देण्यात येते.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे श्री.एन. एम. शेख यांच्या मार्फत नाकारला</u>**

**०२.** मी इमलेना ओळखतो. इमल्यांची विहीर मी घेणार होतो. हे म्हणणे खरे नाही की, ईमल्यांची विहीर बशीर यांनी खरेदी घेतली. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी मला सांगीतल्यामुळे मी पंचनाम्यावर सही केली.

**प्रश्न.** घटनास्थळावरील पंचनाम्यातील मजकुर माहीत आहे का?

**उत्तर.** माझ्या समक्ष लिहीला आहे.

**प्रश्न.** गट क्र. ३७ च्या चतुसिमा सांगा?

**उत्तर.** एक साईड ईमले, एक साईड बशीर, एक साईड सलीम शहा व एक साईड रोड आहे. गट क्र. ३७ अंतर्गत किती वाटण्या आहे हे मला सांगता येणार नाही. गट क्र. ३७ मध्ये तीन मालक आहे. त्यांच्या अंतर्गत चतु:सिमा मला सांगता येणार नाही.

**०३.** बशीरच्या भावाचे नाव मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, बशीरच्या भावाची शेती वेगळी आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ३७ लागुन बशीरची

शेती आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, नसीर यांची शेती आहे.  हे म्हणणे खरे आहे की, मी साक्ष देण्यासाठी फिर्यादीसोबत आलो आहे.  हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला मदत करण्यासाठी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.  हे म्हणणे खरे नाही की, माझे व फिर्यादीचे चांगले संबंध आहे.  हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपींचा दिवाणी वाद आहे.  हे म्हणणे खरे नाही की, खोटा पंचनामा करण्यासाठी मी मदत केली.  हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

Digitally signed by VIJAYA NARAYANRAO KATKAR
Date: 2024.11.16 10:46:10 +0530

**ठिकाण : कन्नड**
**दिनांक : १५.११.२०२४**

**(काटकर विजया एन.एस.)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.३) कन्नड.**